MAHMAR 42198/2013
ISSN 2321-9572

# सामाजिक अनुसंधान

त्रैमासिक- वर्ष १ले • अंक २रा • डिसें-२०१३ मार्च - २०१४ • मूल्य १००रु.
INTERNATIONAL LEVEL REFERED

• संपादक •
कैलास गणपतराव कानिंदे

Scanned by CamScanner

MAHMAR 42198/2013
ISSN 2321-9572

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all subjects*

# सामाजिक अनुसंधान

त्रैमासिक • वर्ष 1 ले • अंक 2 रा • डिसें-2013- मार्च -2014

• संपादक : प्रा. कैलास कानिंदे •

• कार्यकारी संपादक •
डॉ.सिध्दार्थ जाधव (बीड)
मनोज गिमेकर (भोकर)

• सहसंपादक •

डॉ.सुभाष पवार (अमरावती)
प्रा.भारत कल्याणकर (अमरावती)
प्रा.संदिप गोरे (वसमत)
प्रा.व्यंकट कोरेबोईनवाड (जालना)
प्रा. राहुल पंडित (जुन्नर)
प्रा.लक्ष्मण डोंगरे (हिमायतनगर)
प्रा.साईनाथ बनसोडे (औरंगाबाद)
प्रा. सुभाष रगडे (नांदेड)

सामाजिक अनुसंधान त्रैमासिक अंकातील लेखकांची/संशोधकाची मते ही त्यांची वैयक्तिक असून त्याबद्दल मुद्रक, मालक, प्रकाशक, संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

टिप - कॉपीराईट विषयी आलेल्या तक्रारी बाबत संबंधित लेखांचे संशोधक, लेखक जबाबदार असतील. मुद्रक,मालक, प्रकाशक, संपादक मंडळ जबाबदार राहणार नाहीत.

"सामाजिक अनुसंधान" हे त्रैमासिक मुद्रक मनोहर दिगांबर जोंधळे यांनी मालक, प्रकाशक, संपादक कैलास गणपतराव कानिंदे यांच्याकरीता रोहिणी प्रिंटींग प्रेस, वैशालीनगर, प्लॉट नं.19, तरोडा (बु.) नांदेड 431605 येथे छापून कार्यालय "मुक्ताई निवास", वनक्षेत्र कार्यालयाजवळ, समतानगर,भोकर ता.भोकर जि. नांदेड - 431801. येथे प्रकाशित केले.

Scanned by CamScanner

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | शोध निबंधाचे शीर्षक | संशोधकाचे नाव | पृ.क्रं. |
|---|---|---|---|
| ०१ | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा इतिहास विषयक वर्गीय दृष्टिकोन | डॉ.आदिनाथ इंगोले | ०१ |
| ०२ | डॉ .बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली लोकशाही | प्रा. डॉ. राजेंद्र ज्ञानोबाराव शिंदे | ०८ |
| ०३ | भारतातील नक्षलवादी चळवळ : एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा.डॉ.बी.एम.कांबळे | १२ |
| ०४ | प्रसार माध्यमे व राजकीय सुधारणा | प्रा. राहुल पंडित | १५ |
| ०५ | हरितक्रांती : अनुकूल व प्रतिकूल परिणाम | प्रा. साईनाथ राधेशाम बनसोडे | १९ |
| ०६ | शिक्षण हक्क कायदा अंमलबजावणीतील आव्हाने | डॉ. संजय साळुंके<br>श्री. प्रकाश प्रल्हाद इंगळे | २३ |
| ०७ | थोरला बाजीराव पेशवा यांच्या उत्तरेकडील मोहिमा | डॉ.वनिता सावळे | ३० |
| ०८ | स्त्री-सक्षमीकरणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व योगदान | डॉ. पल्लवी एस. भावसार | ३३ |
| ०९ | हमीद दलवाई-मुस्लिम सत्यशोधक मंडळ | प्रा.विकास माधवराव मेहेंदळे | ३७ |
| १० | जागतिक समुद्रीय राजकारण : आसियान आणि भारताचे धोरण | प्रा. सिध्दार्थ राक्षसे | ४२ |
| ११ | प्राथमिक शिक्षण व्यवस्था आणि शालेय गळतीचे आव्हान एक समिक्षा. | श्री. दिपक आनंदराव घोनशेटवाड<br>डॉ. पी. बी. जाधव | ४५ |
| १२ | जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेतील बदल | डॉ. मुळे पी. एम. | ५० |
| १३ | अध्यापन आणि साहित्य : एक अनुबंध | डॉ.अशोक उत्तमराव घोळवे | ५३ |
| १४ | नवोदय विद्यालयातील माध्यमिक स्तरावर इंग्रजी विषयाच्या अध्ययन-अध्यापनाचा अभ्यास | सुभाष संभाजीराव यशवंते | ५८ |
| १५ | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचार | प्रा. पाईकराव किरण शिवाजीराव | ६२ |
| १६ | राजकीय नेतृत्वाचे बदलते स्वरूप | डॉ. सुनील पिंपळे | ६७ |
| १७ | महाराष्ट्रातील भटक्या जमाती : समाज आणि संस्कृती | प्रा. प्रविण वैष्णव | ७१ |
| १८ | हरीतगृह व ओझोन परिणाम एक पर्यावरणीय समस्या | प्रा.गौतम कांबळे डॉ.विजय बैसाणे | ७६ |


Scanned by CamScanner

# प्रसार माध्यमे व राजकीय सुधारणा

**प्रा. राहुल पंडित**
**राज्यशास्त्र विभाग प्रमुख,**
**श्री. शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर जि. पुणे**

**प्रस्तावना :-**

लोकशाही राजकीय व्यवस्थेत प्रसार माध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटले जाते. प्रसार माध्यमांना लोकशाही व्यवस्थेत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार प्राप्त झाला असल्याने त्यांनी आपले स्थान निर्वीवादपणे टिकवून ठेवले आहे. जागतिक स्तरावर जागतिकरणाच्या प्रक्रियेत प्रसार माध्यमे महत्वाची भूमिका बजावत आहेत. पूर्वीपासूनच प्रसार माध्यमांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, सहकार या घटकांत परिवर्तन घडवून आणले आहे.

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासून वृत्तपत्रांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. आजचे युग हे स्पर्धेचे युग म्हणून ओळखले जाते. जागतिकीकरणातून सर्वच राष्ट्रे एकमेकांशी जोडली गेली आहेत. एका राजकीय व्यवस्थेत झालेला बदल हा दुसऱ्या राजकीय व्यवस्थेवर परिणामकारक ठरतो आहे. आज जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण ह्या संकल्पना सर्वच राष्ट्रांत रुजतांना दिसतात व यामध्ये प्रसार माध्यमांची महत्वाची भूमिका आहे. प्रसार माध्यमे ही काळानुसार अधिक गतीशील होतांना दिसतात. आज मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रॉनीक प्रसार माध्यमे उदयास आली आहेत व ते समाज व राजकीय व्यवस्थेत संसुचन घडवून आणण्याचे कार्य करीत आहेत. एका अर्थाने राजकीय व्यवस्थेचे कार्य कसे असावे हे सांगून राजकीय व्यवस्थेला स्थैर्य व गतिशिलता प्राप्त करुन देण्याचे काम करीत आहेत. जनतेच्या राजकीय व्यवस्थेकडे असणाऱ्या अपेक्षा व राजकीय व्यवस्थेला जनतेचा सहभाग याची सांगड घालण्याचा प्रयत्न प्रसार माध्यमे करतात. काळाच्या प्रवाहात प्रसार माध्यमांपुढे अनेक प्रकारच्या जबाबदार भूमिका येताना दिसतात. एका अर्थाने प्रसार माध्यमांना जबाबदार आणि उत्तरदायी बनणे गरजेचे ठरत आहे. प्रसार माध्यमे जी माहिती जनतेकडे व व्यवस्थेकडे पोहचवितात. त्याच्यावरच दोघांचीही भूमिका निश्चीत होत असते. व त्याच्यावरच सामाजिक व आर्थिक बदल अवलंबून असतात. प्रसार माध्यमांनी सत्य त्याच गोष्टी समाजापुढे मांडल्या पाहिजेत. लोकांचे प्रश्न प्राधान्याने मांडून स्वच्छ व्यवहारांचे दर्शन घडवून आणले पाहीजे. प्रसार माध्यमांमुळे जागतिक स्तरावर अनेक राजकीय सुधारणा घडून आल्या आहेत. राजकीय व्यवस्थेच्या कामकाजावर नियंत्रण ठेवून समाजाच्या अपेक्षानुसार राजकीय सुधारणांना वाव प्रसार माध्यमांमुळे मिळाला आहे. आधुनिक काळात लोकांच्या अपेक्षा वाढत आहेत. त्यानुसार राजकीय व्यवस्थेला सुध्दा आपल्या धोरणांत बदल करावा लागत आहे. लोकांमध्ये जाणीव जागृती करणे, शासनाचे धोरण जनतेपर्यंत पोहचविणे, त्यावर लोकांच्या प्रतिक्रिया घेणे, ती प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहचविणे तसेच सामाजिक विषमता, शोषण आणि अन्याय यांच्या विरोधात सतत सक्रिय राहून राजकीय सुधारणा घडवून आणण्याचे काम सध्या प्रसार माध्यमे करीत आहेत. पर्यायाने या व्यवस्थेची एक मुलभूत गरज म्हणून प्रसार माध्यमांचा विचार करावा लागेल. समाजामध्ये संस्कृती निर्मिती करणे, समाजीकरण घडवून आणने, लोकांना त्यांच्या हक्क व कर्तव्याची जाणीव करुन देणे, समाजात होत असलेल्या अन्यायाविरुध्द वाचा फोडणे, सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी मदत करणे, स्त्री अन्यायास वाचा फोडणे, भ्रष्टाचार जनतेपुढे आणणे, लोकांचा राजकीय सहभाग वाढविणे, निवडणूक प्रक्रियेत महत्वाची भूमिका घेणे, सतत जागरुक राहून अंतर्गत व बाह्य संकटापासून देशाला



Scanned by CamScanner

कसे वाचविता येईल याचाही विचार प्रसार माध्यमे करतांना दिसतात. गांधीजींच्या मते, लोकांचे चरित्र घडविणे हेच अंतिम उद्दिष्ट प्रसार माध्यमांचे असते.

**प्रसार माध्यमे व राजकीय सुधारणा :-**

प्रसार माध्यमे ही समाज मनाची वैचारिक जागरण करणारी शक्ती होय. प्रसार माध्यमाद्वारे या संपूर्ण व्यवस्थेची माहिती समाजापर्यंत पोहचवली जात असते. देशाचा राज्यकारभार, प्रशासन कशा पध्दतीने चालत आहे. याची संपूर्ण माहिती जनतेपर्यंत पोहचवली जाते. प्रामुख्याने प्रसार माध्यमे राज्याच्या अनियंत्रित सत्तेवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी जनतेमध्ये जागृती घडवून आणत असतात. जनतेला सर्वतोपरी राजकीय व्यवस्थेच्या कार्याची माहिती होणे गरजेचे असते. लोकशाहीमध्ये लोकांचे शासन ही संकल्पना स्विकारली असल्याने आपल्या देशाच्या कारभारात प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या नागरीकांचा सहभाग असतो आणि हा कारभार कसा चालतो, हे पाहण्याची जबाबदारी नागरिकांची असते. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ आणि प्रसार माध्यमे या लोकशाहीच्या चार आधारस्तंभापैकी न्यायमंडळ व प्रसार माध्यमे यांच्यात भ्रष्टाचाराचा प्रवेश झाला की, लोकशाहीला घरघर लागते. राजकारणी व पत्रकार यांची अभद्र युती घातक ठरत असते. परंतु प्रसार माध्यमांनी आपली भूमिका तटस्थ ठेवली तर मोठ्या प्रमाणात राजकीय सुधारणा होवून परिवर्तन होत असते.

खालील काही मुद्यांद्वारे प्रसार माध्यमांमुळे राजकीय सुधारणा झालेल्या दिसतात.

**१)राजकीय व्यवस्थेविषयी लोकांची प्राथमिक मते तयार करणे.**

आपण स्विकारलेली राजकीय व्यवस्था कोणती आहे तिचे स्वरुप कसे आहे, तिची काम करण्याची पध्दती कोणती आहे. या विषयीची प्राथमिक माहिती प्रसार माध्यमाद्वारे आपणास मिळत असते. स्वातंत्र्यानंतर भारत कोणत्या प्रकारची व्यवस्था स्विकारेल या विषयीची माहिती तत्कालीन वर्तमान पत्रातून जनतेसमोर आलेली होती. या व्यवस्थेचे स्थान कसे असेल, शासनाची संरचना काय असेल या विषयी जनतेची मते तयार करण्याचे काम प्रसार माध्यमे करतात.

**२)राजकीय संस्कृतीची निर्मिती करण्यात सहभाग.**

समाजामध्ये जीवन जगत असतांना व्यक्ती आपले आचार, विचार, अभिव्यक्ती, श्रध्दा, मूल्ये यांची जोपासना करत असतो. म्हणजेच एका अर्थाने आपल्या संस्कृतीची जोपासना करीत असतो. राजकीय व्यवस्थेविषयी ज्या वेळेस लोक आपले विचार प्रकट करतात तेव्हा त्यांची राजकीय संस्कृती दिसून येते. म्हणजेच या व्यवस्थेने कशी धोरणे आखावीत, कशी अंमलबजावणी करावी याविषयी आपले मत व्यक्त करतात. राजकीय व्यवस्थेला स्वत:चे स्थैर्य व अधिमान्यता टिकवून ठेवावी लागते व पुरक स्वरुपाची कार्ये करावी लागतात. मुळात सामाजिक व राजकीय संस्कृतीच्या निर्मितीमध्ये प्रसार माध्यमे विचारांचे आदान-प्रदान करुन महत्वाची भूमिका बजावतात.

**३) रुपांतरणाची प्रक्रिया जाणून घेण्यासाठी.**

प्रसार माध्यमांमुळे जागतिक व्यवस्थेत होत असणारा बदल नवीन राष्ट्रांची निर्मिती त्या राष्ट्रातील आधुनिकीकरणाच्या विकासाची प्रक्रिया समजूनघेता येते .एक विचारप्रणाली जावून नवीन विचारप्रणाली येत असते. ती नवीन विचार प्रणाली समजून देण्याचे कार्य सुध्दा प्रसार माध्यमे करीत असतात.

**४) राजकीय सहभागाची निर्मिती.**



Scanned by CamScanner

प्रत्येक राजकीय व्यवस्थेला स्वतःची अधिमान्यता टिकवून ठेवण्यासाठी लोकांच्या सहभागाची आवश्यकता असते. राजकीय सहभागातून जनतेच्या विचारांना व व्यवहारांना दिशा मिळत असते. राजकीय व्यवस्थेवर नियंत्रण व संतुलन ठेवता येते. राजकीय सहभागामुळे राजकीय व्यवस्था आधिक कार्यक्षम होते. वृत्तपत्राच्या माध्यमातून राजकीय पक्ष आपल्या पक्षाच्या ध्येयधोरणाची माहिती जनतेपर्यंत पोहचवितात. आकाशवाणी व दुरदर्शनच्या माध्यमातून शासनाचे महत्वाचे निर्णय त्यावरील प्रतिक्रिया यांच्या प्रसारणाने जनतेचे राजकीय प्रबोधन घडून येते ,त्याच्या परिणाम म्हणजे जनतेचा राजकीय सहभाग वाढतांना दिसतो.

**५)लोकमत निर्मितीत महत्वाची भूमिका**

संसुचन माध्यमे हे जनतेच्या मनावर प्रत्यक्ष प्रभाव पाडणारे घटक आहेत. सार्वजनिक घडामोडींची आणि प्रश्नांची संपुर्ण वस्तुनिष्ठ माहिती प्रसार माध्यमाद्वारे लोकांपर्यंत पोहचविली जाते. राजकीय व्यवस्था (शासन) व जनता यांना जोडणारा दुवा प्रसार माध्यमे असतात. आकाशवाणी, दुरदर्शन, चित्रपट, वृत्तपत्रे यांद्वारे व्यवस्थेची इत्यंभूत माहिती जनेतेपर्यंत पोहचवली जाते व जनतेच्या प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहचविल्या जातात. शासन संस्था, नेते आणि श्रेष्ठजन विद्वानांचे मत समाजात सर्वदुर पसरविणारा व प्रत्यक्ष परिणाम साधणारा घटक म्हणून प्रसार माध्यमांकडे बघीतले जाते.

**६)धोरण निर्णय प्रक्रियेत महत्वाची भूमिका**

कार्ल डवाईश ने असे म्हटले आहे की, राजकारणाचा सबंध काही सामाजिक उद्दिष्टे साध्य करणे असतो. ही उद्दिष्टे साध्य करतांना मानवी प्रयत्नात समन्वय साधणे हे राजकारणाचे महत्वाचे वैशिष्ट्ये होय. राजकीय व्यवस्थेने कशी व कोणत्या प्रकारचे निर्णय घ्यावेत या बाबतीत समाजाचेही मत तयार होत असते. बळाच्या सहाय्याने समाजात कोणत्याही धोरणाची अंमल बजावणी होऊ शकत नाही. तेव्हा प्रसार माध्यमे राजकीय व्यवस्थेने घेतलेली धोरणे कोणती ? त्याचा परिणाम काय होतो याविषयी जनता व शासन यांना माहिती पुरवितात. एका अर्थाने ते धोरण निर्मितीत महत्वाची भूमिका बजावतात.

**७)निवडणुकांमध्ये महत्वाची भूमिका**

प्रत्येक राजकीय पक्ष सत्तेत येण्यासाठी प्रयत्नशील असतो. प्रत्येक राजकीय पक्षाची एक विचारप्रणाली असते. निवडणुकांच्या काळात आपला पक्ष सत्तेवर आल्याने कोणती धोरणे घेईल याविषयीचे मत मांडत असतो. त्या मतांना जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम प्रसार माध्यमांचे असते. सध्या सत्तेत असलेल्या पक्षांचे धोरण किती चांगले व जनतेच्या हिताची व अहिताची कशी आहेत यावर ही प्रसार माध्यमे मते तयार करतात. निवडणुकीचा निकाल लागण्यापूर्वीच लोकमत जाणून निकालांचा अंदाज व्यक्त करतात. निवडणुका दरम्यान मतदारांचे मत ऐकून घेतात. लोकांच्या अपेक्षा काय ? त्या कीतपत पूर्ण झाल्या व कशा पूर्ण करता येतील याविषयीचे मते प्रसार माध्यमांकडून शासनापर्यंत व इतर राजकीय पक्षापर्यंत पोहचविण्याचे काम प्रसार माध्यमे करीत असतात.

**निष्कर्ष :-**

आधुनिक काळात प्रसार माध्यमे शासन व जनता यांना जोडणारा दुवा ठरत असल्याने त्यांचे महत्व वरचेवर वाढतांना दिसते. माणूस हा सामाजिक प्राणी आहे. त्यांच्या गरजा ह्या समाजातच पूर्ण होत असतात. त्यांना इथेच सामाजिक व राजकीय गोष्टीचे ज्ञान प्राप्त होते. म्हणजेच समाजीकरणाची प्रक्रिया विकसीत होते व यात प्रसार माध्यमे महत्वाची भूमिका बजावतात. राजकीय व्यवस्थेच्या सर्व कार्यांची माहिती जनतेला देणे व जनतेचे मत शासनापर्यंत



Scanned by CamScanner

पाठविणे या महत्वपूर्ण कार्याबरोबरच सर्व प्रकारच्या दबावापासून मुक्त होऊन प्रसार माध्यमांनी जागरुकपणे कार्य केल्यास सामाजिक परिवर्तन होऊ शकते. जागतिकीकरणाने अनेक प्रकारच्या समस्या निर्माण केलेल्या आहेत. तसेच अनेक नवीन आव्हाने उभी राहीली आहेत. तेव्हा प्रसार माध्यमांना आधिक काळजीपूर्वक वाटचाल करावी लागेल. प्रसार माध्यमे ही जरी राजकीय, सामाजिक सुधारणा घडवून आणण्यात मोलाची भूमिका बजावत असले तरी एक प्रगल्भ लोकशाही रुजवण्यात प्रसार माध्यमांना आधिक कष्ट घ्यावे लागतील.

एक प्रश्न असाही पडतो की प्रसार माध्यमे देत असलेली माहिती कितपत योग्य आहे ? कारण आज प्रसार माध्यमे एका व्यावसायिकतेतून जातांना दिसतात. कधी कधी अनावश्यक प्रश्नांना अनेकवेळा समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळेस नक्कीच समाजाचे नुकसान होते. तेव्हा प्रसार माध्यमांनी आपली भूमिका ही प्रसार माध्यमांच्या संख्यात्मक वाढीच्या बरोबरच गुणात्मक विकासात सुध्दा वाढवावी. प्रसार माध्यमांनी मार्गदर्शकाचं भूमिका बजवावी. म्हणजे प्रसार माध्यमे ही एक प्रतिम निर्माण करणारी व्यवस्था असते. चांगली प्रतिमा असेल तर समाजाचा, राज्याचा विकास तेजीने होऊ शकतो.

**संदर्भसूची :-**

१)भारतातील प्रसार माध्यमे काल आणि आज, जे.व्ही. विलानिलम, अनुवाद जयमती दळवी, समन्वय संपादक. प्रा. गणेश राऊत, डायमंड पब्लीकेशन, पुणे. २००८

२)समाचार - अर्थात प्रसार माध्यमांची झाडाझडती, जयदेव डोळे लोकवाड्मय गृह, मुंबई - २००८

३)मीडीया, डॉ. विश्वास मेहंदळे, अनुबंध प्रकाशन पुणे - ४३, २००५

४)आधुनिक राजकीय विश्लेषण, प्रा. विलास आवारी, श्री. सुरेश देवरे, डायमंड पब्लीकेशन, पुणे - २०११

४)www.google.com.



Scanned by CamScanner